म. ग्रं. सं. ठाणें
विषय का. व्य
सं. नं. ८४७
२१७१९३३

गा

मनमोहन

१०

REFBK-0004954
REFBK-0004954

भ्रमर मंडळ, पुणें

REFBK-0004954

REFBK-0004954

# प्रियबंधू—

रा. रा. गोविंद नरहर नातू

सबडिव्हिजनल ऑफिसर इन जार्ज,

मालेगाव

यांस अर्पण

'मनमोहन'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र. क्र. ४९५४

# सुनीत गंगा.

## मिस्—मेयोस.

चाल–पांडवा संम्राट पदाला

भारताच्या गफ्लतीचा । फायदा मी घेतला
ही बढाई योग्य आहे । शिफारशीला तुला
दैव दैन्याच्या दमानें । देशदास्यी रातला
मानहानीची परंतू । चीड आहे त्याजला
पूज्य व्यक्ती मानिली जी । ज्या बुजुर्गी लाभलीं
तीं विभूती तू बिलंदर् । मिजाशीनें लेखिली
अल्पज्ञानाचा तुझा गें खळ्खळे हा धब्धबा
मान द्यायाला तयाला । तयाला कुणाचा ना
मनूसुबा
जास्त सांगायास माझी । घे मुळीं ना दिल्खुशी
हा इषारा मात्र देतो । विस्तवाशी खेळशी

ता. २।११।२७ बडोदे.

## तीं नाहींच प्रसन्न होत––

तेव्हापासुन सावधान सगळीं अस्तंगता
अस्करा ।

बुद्धीजन्य चमत्कृती प्रचुरशा, खरीज
वाक्वैभव ।
क्रोधाचा बडिवार फार म्हणुनी सांजावले
संयम ।
रात्रीचा रमणीय रंग, बघणें दर्याकिनारीवर।
प्रीतीचा पथ राजमार्ग, म्हणुनी गाफील
मी राहिलों ।
त्याचा घेवुन फायदा,-झट दगाबाजी अशी
केलिस ।
केली मी अभिषिक्त, काय ? नव्हती प्रीती
तुझी चंचळ ।
इच्छापूर्ति करावयास्तव, न का ? बुद्धी--
बळा, खर्चिलें ।
माझा;-मीच कृतज्ञ हे कळविण्याचा हा
इरादा नव्हे ।
किंवा तूंच कृतघ्न,-दीन इतुकी माझी न
दिल्दानत ।
कां? निन्दून तुला पुनःपुनरपी, माझी निराशा
शमें ।

प्रेमावाचुन-यास योग्य न दुजें कांहीं जगीं
औषध ।

\+ + + + +

स्फूर्तीची करतो ससज्ज-इतुकी मार्गप्रतिक्षा
तरी ।
ती नाहींच प्रसन्न होत ! सदये इष्कानिराळी
न ती ।

ता. १।५।२४ पुणें.

## स्मशानांतली आठवण

झाली पूर्ण चिता रचून, ' स्वकरें हां
पेटवा ती अतां '
बोले भट्जि, तसाच मी बसुनिया वाळूमध्यें
राहिलों.
केला आग्रह फार, लावुन दिली काडी
चितेला तुझ्या
गेले शीर्ष भणाणुनी, कडकडे विद्युलता
अन्तरीं

अश्रूंची झिमझीम, काहुर उठे चित्तामधें
वादळीं
पंचप्राण तुझ्या सर्वच सुमसे गेले तिथें पोळुन
झालें काय न काय ' ते स्मरतसें, पे सांगता
ना पण

\+ + + + +

" तूझें हेच नशीब ' ' अन्तर ' वदें देवून
संवेदना
काळाच्या घरट्यांत तूंहि, तरुणा जाणार
केव्हां तरी
आणी तेंच खरें ' मकाण अपुलें आहे
चिरस्थावर
मुक्कामातिल मार्गिच्या सवडिच्या या
ओळखी पाळखी.
गेला भंगुन तद्दुवा म्हणुनि कां ? भग्नांग
झालास तू

× × × × ×

गेलें दुःख थिजून, आणि यमुना डोळयांतल्या
आटल्या.

' गेले लोक निघून ' सावध मिही होता
निघालों घरीं.

ता. १५।११।२६. पुणें.

## तुफानांतला तांडेल !

छेः- गेला खवळून हा, प्रणयिनीं,-रंगेल
दर्या बघ ।
ही आलीच सफेत लाट-दिसतें कन्या-
कुमारीसम ।
अस्मानांत कडाडुनी,-तडफडे,-विद्युलता
आशकीं ।
तेव्हां, मी, तर, मागमूस नव्हता, ही नाव
हाकारली ।

\+ + + +

हाकारू, करुनी शिकस्त, इथुनी तारू;
परंतू कसें ? ।-
गेलें फाटुन शीड,-आणि-इकडें-गेले
पिचोनी व्हल्हें।

दोहातांतिल ताकदीवर तुफानीलाट-पेलू
कसा ? ।
होणारे पुढचें भविष्य, उघडें, खोलून दावू
कसा ?

\+ + + +

हे सद्भाग्य समीप तूहि असशी माझ्या
अखेरीमधें ।
बेहस्तामधि मृत्युलोक वसती सोडून जावू
चल ।
हे अश्रू अनिवार;-पूस-, इथली सारीं तऱ्हा
नश्वर ।
ही आली...जबड्यामधें जखडण्या कष्टांत
कल्लोलिनी ।

\+ + + +

भस्मीभूत क्षणामधें मिसळलें तें पंचभूतामधें।
झाली लाट दुभंग—आंत गढलें-शांती
चिरंजीव ती ।

३-२-२८ पुणें

## मृत्यूस

यँ आतांच विलंब लावुनि नको छेडू मला
कारण
तारुण्यांतिल अल्पकाळ उरला आहे नव्या
स्फूर्तिचा
लोकीं मान, अजून नाहि शिवली चिंता
कधीं मानसा.
आकांक्षा अजुनी नवोदित अशा आहेत
उत्कंठित.
आशांची अवहेलना बघुनिया डोळ्यापुढें
आपुल्या
मृत्यूला कवटाळणें कधिहि या मानीं रुचेना
मना
कार्यक्षेत्रि खपूनिया निजकरें मी रोपटें
लाविलें
मी खाणार न पाहणार, फळ, अन् त्याचीं
उपेक्षा कधीं
पश्चातापविदग्ध अश्रु भरलें नाहीं कधीं
लोचनी

कर्तृत्वीं दुबळी न शक्ति ठरली, दुर्दैवि वा
वैभवी,
वृत्तीला शिवला न जो वारे गड्या संताप
तापप्रद
कर्तव्यीं निजकार्यमग्न असतां, घेवून जा तूं
मला.

२।११।२४ तळेगांव.

## चिंता करीना क्षमा

आई...आणि तुझ्या छबीस धरिलें, पश्चात्-
हृन्मंजुषीं।
नाहीं चाहुल लागली, यम कुठें,? झालों न
मी सावध।
कालव्याधशरें अकल्पित, अशी केली तुझी
पारध।
दुःखाश्रू विरहोद्भवीं, गळुनिया, ओथंबली
ही उषीं।

प्रेमाचें अमरत्व ठावुक मला, राहील तें
अक्षय ।
मूर्ती वावरती तुझी पण कुठें ? आई दिसेना
मला ।
ही मध्यान्ह, प्रभा प्रकाशित रवी, चिद्दीप
अंधारला ।
हर्षानंद न भेट देत हृदया, कीं त्यास वाटे
भय, ।

\+ \+ \+ \+

आहे आज, विकारसिंधु, खवळे, कोजागिरी
पौर्णिमा ।
भारद्वाज वडावरी बसुनिया-निर्मी तरंगा-
वली ।
शेजारीं बगिच्यामधें सवंगडी खेळामधें
रंगली
मी अस्वस्थ मनामधें तळमळें, चिंता करीना
क्षमा ।

\+ \+ \+ \+

माझा जीव तुझ्याकडे-निगटण्या-बेहद्द
झेपावतों ।
नातू सून तुझी, जिवंतपण ना, आहेत
माझ्यामुळें ।
३०।१।२७ पुणें.

माझें भविष्य तुझ्या हातांत आहे.

मी केलीच निवेदन तुला माझी स्थिती
आजची ।
माझी कीर्त परप्रकाशित न जी झाली असें
अप्रुशी ।
या मुल्खास पहावयास्तव, परागन्दा
फिरस्ता असें ।
नाहीं ठावुक गें निहायत मला, रीति रिवाजी
कशी ।

\+ + + +

पर्वा मी बगिच्यांत, लांबुन तुझी लोलंगता
पाहिली ।
तिकीं मान करून तू बघितलें, मर्यादवंन्ती
सम,

त्या रात्रीं घन, भासले मज तुझें सौंदर्य
सौदामिनी
राणी त्याच क्षणी, जितेंद्रिय न मी, बन्दा
तुझा जाहलों

\+ + + +

चित:शांति मिळावया विरचुनी मी गाइलें
गज़ल।
स्फूर्ती होवुनिया अकल्पित मनीं, पेशा कवींचा
नसे
प्रेमाची, असितानने, स्वखुषिनें, तूं घाल
भिक्षावळ।
दीनाची शुभ मागणी, करु नको, बेखूष
नामंजुर

\+ + + +

होकारांत तुझ्या,-भविष्य पुढचें माझे असे
बांधले।
दिल्दर्यां खवळून-नीर बघ हें डोळ्यातुनी।
धावले

ता. १।२।२५ पुणें.

## नूतन मराठी शाळेस.

जातांना तुज सोडुनी, गहिवरें, ओलावले
लोचन ।
शून्यापून समस्त जीव अगदीं गेला पिसा
होवुन ।
झालो पास, अतां प्रवेश करण्या मी विश्व-
विद्यालयीं ।
गे जाईन; सुखानुभूति मुकली शाळेंतलीं या
वयीं ।

\+ + + +

ती घाई करणें-अगोदर पुढें पोचावयाला
तिथें ।
चोराचोरि हळूच नंबर वरीं येण्यास
मार्कांमधें ।
होता ती उघडी बळें करुनियां तक्रार कोणी
छड्या ।
खेळाच्यामाधि आपुलीं प्रविणता व्हाया
मनाच्या उड्या ।

हे सारे स्मरतें समोरून तुझ्या जाताच
मार्गावरी ।
" गेला बाळपणा ' इषारत कुणीं दे हालके
अंतरीं ।
आलें ज्ञान बरेच; मात्र सगळीं गेलीं सुखें
त्यामुळें ।
सौख्याची इथल्या अतां हळुहळु विमोलता
आकळे ।

\+ \+ \+ \+

पाठीला पिशवी-दवूत धरूनी हातामधें
चालतां ।
कोणी बाळगडी, मनांत बहुधां हेवा मला
वाटतों ।
ता. २८-१-२१ पुणें.

## राणी खुळूदे कळीं.

शंकेच्या प्रखर प्रभेंत सजणें प्रीतीं फुलावी
कशी ।
गुंतागुंत विगूढ केवि कळणें, प्रेमप्रेमे यातली,

जी अव्यक्त व्यथा विदारण करी हृद्भावना
मखमली
विस्फारून सरोज लोचन तुझे, जाईल सांगें
कशी

\+ + + +

स्वर्गंगेसम पाहुनी चिरमयी, सौंदर्य
लोकेश्वरी ।
स्फूर्तीने हृदयस्थ भाव हलले, ही ईश्वरी
प्रेरणा.
रूपोन्माद भरांमधें महिरल्या चित्तांत
संवेदना
अस्मानी कुमुदावली विखुरलीं सालंकृता
शर्वरी·
ही आरास पहा-बनावठ नसे-शोभा
बगीच्यांतली
गुलमारीं बटमोगरा-दरवळें सौगंध वात्यावरी
कारंज्या जवळील कोच बघतो, जावू बसू
त्यावरी

गुंफूदे मज अर्ध सैल बुचडा, राणी खुळू दे
कळी

\+ + + +

नाहीं जोवरि गर्जली, प्रियतमें बुर्जावरि
नौबत—
युद्धाची, पुरवीन कोड सगळें, बाणा असे
रजपुती

ता. २।१।२८ पुणें

---

मुद्रकः—

गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी, श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स ४९५–९६
शनवार, पुणें शहर.

प्रकाशकः—

रा. रा. गोपाळ नरहर नातू
यांनीं ३२५ Y अशोकाव्हिला, सदाशीव पेठ,
पुणें. येथें प्रसिद्ध केले.

REFBK-0004954

REFBK-0004954